MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२६९ | शनिवार दि.२२ जुन २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -269 | SATURDAY DT. 22 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## भोंगळा कारभार दोन महिन्यात पडले तीन वेळा विद्युत पोल



उपळी ।प्रतिनिधी

महावितरण चा भोंगळा कारभार. दोन महिन्यापूर्वी केलेल्या कामाची विद्युत पोल दोन महिन्यात तीन वेळेस पडले. मौजे उपळी हे गाव कुप्पा सब स्टेशन अंतर्गत विद्युत सप्लाय होत आहे या गावांमध्ये दर आठ दिवसाला विद्युत पुरवठा खंडित होत आहे प्रत्येक वेळेस विद्युत पुरवठा खंडित होण्याचे कारण एकच आहे नवीन लाईनचे केलेले काम अत्यंत बोगस पद्धतीने केलेले आहे मुळात हे काम करीत असताना संबंधित अधिकारी कर्मचारी यांनी काम होत असताना कामावरती निगराणी करणे हे गरजेचे होते परंतु गुत्तेदार व अधिकारी यांच्या संगनमताने हे काम झालेले दिसून येत आहे. या कामांमध्ये विद्युत पोलो उभे करीत असताना पोलाच्या खालती सिमेंट काँक्रीट करणे गरजेचे असते परंतु एकाही पोल मजबुतीचे काँक्रिटीकरण केलेले नसल्याने थोडंही वार .पाऊस. आलं की पोल जमिनीला सलाम मारताना दिसतात. आणि पोल पडले की गावातील वीजपुरवठा आठ दिवस. पाच दिवस. तीन दिवस. अशाप्रकारे खंडित असतो लोकांचे बेहाल होतात उन्हामध्ये गर्मीने व रात्री मच्छर डेंगू चे ढास लहान लहान लेकरांना चावतात अशा प्रकार उपळीकर महावितरणच्या कारभाराला फार वैतागून गेला आहे. महावितरणच्या या गलतानकारभाराकडे माजलगाव तालुक्याचे आमदार प्रकाश दादा सोळुंके यांनी लक्ष द्यावे अशी मागणी उपळी येथील ग्रामस्थ करीत आहे.

# बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे पालकमंत्री कलेक्टर व प्रशासकांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष? – कपिल सोनवणे

## १५० कोटीचा हिशोब सिओ निता अंधारे किरण देशमुख गणेश पगारे देतील का नाही?

बीड /प्रतिनिधी

**नगरपरिषदेतील बांधकाम विभागत व इतर सर्वच विभागात सबंधित विभागातील अधिकारी यांना टक्केवारी घेऊन फक्त कागदावरच कामे दाखावून बील उचलले जातात ?**

**१) नगरपरिषदेत ऐवढा भ्रष्ट कारभारा झाला आहे की २०२२ च्या पूर्वी केलेल्या कामाचे देयके केवळ टक्केवारी भेटेना म्हणुन देयक बिलं अडविले आणि २०२४ ची चालू मधील असताना त्याना केवळ टक्केवारी घेऊन देयकं दिले त्यामूळे केवळ टक्केवारी शिवाय काहीही होत नाही. तूम्ही कितीही ओरीजनल कामे करा त्याला महत्व नाही. मात्र टक्केवारी दिली तर कामे नाही केली तरी चालतात अशा पध्दतीची अवास्था बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे अकाउंटंट गणेश पगारे उप अभियंता बांधकाम विभाग नगरपरिषद प्रशासन व अधिकारी कर्मचाऱ्यांनी केली आहे.**

३)मागील वर्षातील उ्झऊ, दलीत वस्तीतील मंजूर झालेली कामे न करताच फक्त कागदपत्री दाखवून बील उचलली आहेत माञ हा सर्व प्रकार मुख्याधिकारी निता अंधारे, बांधकाम उपअभियंता किरण देशमुख, लेखापाल गणेश पगारे तसेच कन्ट्रक्शन यांच्या संगण मताने करून दलीत वस्तीतील कामे करण्यास जाणून–बुजून टाळाटाळ केली जाते.

तरी मा. जिल्हाधिकारी साहेब यांना विनंती कारण्यात येते की, १५ दिवसाच्या आत आमच्या तक्रारीची दखल घेण्यात यावी अन्यथा विभागीय आयुक्त कार्यालय संभाजीनगर येथे लोकशाही पध्दतीने आंदोलन करण्यात येईल अन्यथा दखल न घेतल्यास इशारा न देताच जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आत्मदहन करण्यात येईल असा इशारा कपिल सोनवणे यांनी दिला.बीड नगर परिषदेमध्ये रुपयाचे भ्रष्टाचार करण्यात आलेले आहे यामध्ये पगारे अंधारे देशमुख हे गुत्तेदारांना पोचत आहेत एक रुपया न देता स्वतःच्या नातेवाईकाचे नाव नीता अंधारे पगारे देशमुख ही गुत्तेदारीमध्ये माहीर झाले आहेत.






- गणेश पगारे ने तर भ्रष्टाचाराचा कळसच गाठला किरण देशमुख ने बोगस इस्टिमेट देण्यामध्ये पीएचडी केली का?
- सिओ निता अंधारेनी स्वताच्या भावाला पुढे करत गुत्तेदारांची पाठराखण केली पण त्यातही टक्केवारी? निता अंधारेला दहा टक्के गणेश पगारे ला पाच टक्के किरण देशमुखला पाच टक्के दिल्याशिवाय फाईल पुढे जात नाही. तर शिपायाला ही ५००० द्यावे लागतात?
- बीडच्या नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे प्रशासक आल्यापासून बीड नगरपरिषद विकून खाल्ल्याची चर्चा बीड शहरामध्ये जोर धरत आहे बीड शहरात घाणीचे साम्राज्य मुख्याधिकारी अंधारे टक्केवारीच्या अंधारात गुंग?
- बीड नगरपरिषदेच्या मुख्यधीकारी निता अंधारे बांधकाम विभागाचे उपअभियंता किरण देशमुख, लेखापाल गणेश पगारे यांनी नगरपरिषदेच्या सर्व निधीची उतरंड उतरवली यांच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्यात यावी–कपिल सोनवणे
- बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे, बांधकाम विभागाचे उपअभियंता किरण देशमुख, लेखापाल गणेश पगारे यांनी निता अंधारे यांच्या सांगण्यावरून टक्क्याने विकला नगरपरिषदेचा निधी



ओबीसी आरक्षण वाचवा करीता श्री संजय काले साहेब हे नालवंडी येथे आमरण उपोषणास बसले असता श्री जगदीश गुरखुदे,दत्ता परलकर,राजकुमार जैन,सद्दाम आतार व नालवंडी येथील आमचें स्नेही मित्र मंडळ तंबरे बंधु लचके बंधु वाघमारे बंधू मस्के बंधु काळे बंधु राऊत बंधू पंच क्रोषीतील नागरीक ई.भेट देताना.. द्वारकाधीश मित्र मंडळ बीड

## लोकनेते स्व.विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंतीनिमित्त कृतज्ञता सप्ताह

### ३० जून रोजी होणार जयंती साजरी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र लोकनेते विनायकराव मेटे यांचा २०२२ साली मराठा आरक्षण बैठकीला मुंबईला जात असताना मुंबई पुणे दुर्तगती मार्गावर अपघात झाला आणि त्यात ते आपल्याला सोडून गेले आयुष्यभर समजातील विविध घटकासाठी त्यांचे कार्य विसरता येणारे नाही. त्यामुळे ३० जून रोजी त्यानीची जयंतीचे औचित्य साधून त्यांच्यावर प्रेम करणारे कार्यकर्ते, हितचींतक कृतज्ञता सप्ताह म्हणून साजरा करणार आहेत.



लोकनेते विनायकराव मेटे यांची ३० जून रोजी जयंती साजरी करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने त्यांच्या स्मृतीस उजाळा देण्यासाठी आणि त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रभर विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजिन करण्यात आले आहेत आणि दि.. २३ जून ते २९ जून या कालावधीत हा कृतज्ञता सप्ताह आयोजत करण्यात आला आहे. यात स्व.विनायकराव मेटे यांनी त्यांचा वाढदिवस नेहमी समजिक उपक्रमानी साजरे केले त्यांना अभिप्रेत अश्या कार्यक्रमानी त्यांची जयंती साजरी करण्याचा मानस त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या चाहत्यांनी केला आहे. जिल्ह्यासह राज्यात रक्तदान शिबिर , विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, वृक्षारोपण, अल्प दरात ठज फिल्टरचे वाटप, रक्त तपासणी शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, स्वच्छता मोहीम, निराधारांना ब्लँकेट वाटप, गरीब विद्यार्थ्यांना रेनकोट वाटप अशा विविध उपक्रमांनी ही जयंती साजरी होणार आहे.

## शहरातील नाले सफाई व संपूर्ण स्वच्छेते बाबत तातडिने कार्यवाही करावी– माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड/प्रतिनिधी

बीड शहरातील नाले सफाई व संपूर्ण स्वच्छेते बाबत तातडिने कार्यवाही करावी अशा सूचना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांना दिलेल्या निवेदनात दिल्या आहेत आगामी पावसाळा लक्षात घेता बीड शहरातील सखल भाग व इतर भागातील नाले सफाई ची कामे तातडिने पूर्ण होणे गरजेचे आहे, शहरात सध्या मोठ्या



प्रमाणात जागोजागी कचरा जमा झालेला आहे. पाऊस पडल्यावर जमा झालेला कचरा हा नाल्यात जमा होतो व यामुळे नाल्या मोठ्या प्रमाणात तुंबल्या जातात. त्यामुळे शहरातील सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचते व रस्त्यांवर हि मोठ्या प्रमाणात अडथळा

निर्माण होऊन नागरिकांना त्रास होतो. या सर्व बाबी पहाता शहरातील कचरा तातडिने हटवून नाल्या साफ करणे आवश्यक आहे.शहराच्या मध्य भागातून बिंदुसरा हि नदी वाहते या नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात झाडी आलेली आहे.तसेच अनेक ठिकाणचा कचरा हा नदीच्या पात्रात अडकतो व पाणी तुंबल्याजाते अतिवृष्टी झाल्यास नदीचे पाणी शहरात घुसण्याची शक्यता आहे.यापूर्वी काही वर्षांपूर्वी बिंदुसरा नदीला मोठा पूर आलेला होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जिवित व वित्तहानी झालेली होती. तरी या सर्व बाबींचा विचार करता बीड शहरातील नाले सफाई व कचरा हटविण्याचे काम तातडिने पूर्ण करण्यात यावे या करीता नगर परिषद प्रशासक व मुख्यकार्यकारी अधिकारी नगर परिषद, बीड यांना तातडिने कार्यवाही बाबत सूचित करावे अशा सूचना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे

## कोकण, विदर्भासह मराठवाड्याला पावसानं झोडपलं, मुंबईकरांना मात्र पावसाची प्रतीक्षा

मुंबई : राज्यात विविध भागात पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. ठाण्यात पहाटेपासूनच मुसळधार पावसाला सुरुवात झाली, त्यामुळे कामगार वर्गाचे हाल झाले. मुंबईकरांना मात्र, अद्याप पावसाची प्रतीक्षा कायम आहे. मुंबईत तुरळक ठिकाणे वगळता गेल्या चार दिवसांपासून पाऊस दडी मारुन बसला आहे. ठिकठिकाणी पाणी साचण्यास सुरुवात झाली. पावसाळ्यामुळे वाहतूक धिम्या गतीने सुरु होती. वंदना डेपो परिसरात पाणी साचायला सुरुवात झाली. शुक्रवारी दिवसभराच्या विश्रांतीनंतर आज पालघरमध्ये पुन्हा एकदा मुसळधार पाऊस सुरू झाला. पहाटेपासूनच पालघर, बोईसर परिसरात मुसळधार पाऊस पाहायला मिळाला. भात पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांची शेतीच्या कामाची लगबग सुरू झालीय.

अनेक दिवसांच्या विश्रांतीनंतर परभणी शहरासह जिल्ह्यात दमदार पावसाने हजेरी लावली आहे. वादळी वारे,विजांचा गडगडाट आणि जोरदार पाऊस परभणीत झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून खोळंबल्या पेरण्यांना आता गती येण्याची चिन्हं निर्माण झाली आहेत. सर्वसामान्य परभणीकरांनाही उकाड्यापासून काहीशी मुक्ती मिळालीय. जोरदार पाऊस बरसल्याने वातावरणही थंड झालं आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील अनेक भागात सकाळपासून पावसाची रिपरिप सुरु आहे. खामगाव, शेगाव, संग्रामपूर परिसरात दमदार पाऊस तर इतर भागात हलका ते मध्यम पाऊस सुरू आहे. वाशिम जिल्ह्यात काही भागात तीन ते चार दिवसापासून दडी मारलेल्या पावसाने जिल्ह्यात काही ठिकाणी रात्री जोरदार हजेरी लावली. त्यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात का होईना दिलासा मिळाला तर, दुबार पेरणीचे संकट टळणार आहे. जिल्ह्यात मोठ्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

# सत्तेच्या दबावाखाली चुकीचे दाखले दिले आहेत का? असल्यास त्याची चौकशी करा

## मुंबईत ओबीसी नेत्यांची बैठक ; पंकजाताई मुंडे यांची मागणी
## राज्याच्या प्रमुखांनी ओबीसी आंदोलनाला भेट देऊन बहुजनांना सन्मान द्यावा

मुंबई ।प्रतिनिधी

सत्तेचा गैरवापर करुन किंवा दबावाखाली चुकीचे सर्टिफिकेट दिले गेले आहेत का? असल्यास त्याची चौकशी करावी, तसेच ओबीसी आरक्षणाला धक्का कसा लागत नाही याबद्दलची स्पष्टता करावी अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज ट्विटद्वारे सरकारकडे केली.

सहयाद्री अतिथीगृहात आज राज्यातील प्रमुख ओबीसी नेत्यांची बैठक सरकारने बोलावली होती. वडीगोद्री येथे सुरू असलेल्या आंदोलना संदर्भात ही बैठक होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, पंकजाताई मुंडे यांच्यासह प्रमुख नेते यावेळी उपस्थित होते.

लक्ष्मण हाके यांनी सुरू केलेल्या उपोषणा संदर्भात पंकजाताई मुंडे यांनी ट्विट करत सरकारकडे मागणी केली आहे ,त्या म्हणाल्या, राज्यातील काही महत्वाच्या नेत्यांचे शिष्टमंडळ हे लक्ष्मण हाके यांना वडीगोद्री येथे जाऊन भेटल्याचे समजते. ते योग्यच आहे. हाकेंचे उपोषण हे त्यांचे नसून हा कायद्याच्या चौकटीत सर्वांना समान न्याय देण्यासंदर्भातील भूमिका आहे. सत्तेचा गैरवापर करुन किंवा दबावाखाली चुकीचे सर्टिफिकेट दिले गेले आहेत का? असल्यास त्याची चौकशी करावी, तसेच ओबीसी आरक्षणाला धक्का कसा लागत नाही याबद्दलची स्पष्टता करावी. या साध्या त्यांच्या दोन मागण्या इतर मागण्यांसमवेत आहेत. शिष्टमंडळाने उपोषणास भेट दिली असली तरी राज्याच्या



प्रमुखांनी तिथे जाऊन भेट द्यावी, म्हणजे या समस्त राज्यातील बहुजनांना सन्मान दिल्यासारखे होईल असं त्या म्हणाल्या.



ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित वालचंद विद्यालय व जुनिअर कॉलेज कळंब येथे २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रपती पदक विजेते योगशिक्षक श्री शंकर कवळे सर व क्रीडा शिक्षक श्री काळे सर यांनी यांनी खूप छान व अचूक योगासने, प्राणायामे, करून दाखवली व त्यांच्या समवेत मुलांनी देखील छान प्रकारे योगासने , प्रणायमे केली. त्यावेळी आजच्या धावपळीच्या युगामध्ये योगासने व त्यांचे किती महत्त्व आहे ते विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. त्यावेळी सर्व विद्यार्थी व शिक्षक बंधू भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी देखील उत्तमरीत्या योगासने केली. सूर्यनमस्कार , कपालभाती, अनुलोम विलोम, भ्रमरी, बसरका, अशी विविध प्रणायमे व योगासनाचा समावेश होता. ओम साधना, हास्यासन , व भजन कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. सर्वांनी जोरदार टाळ्यांचा प्रतिसाद देऊन आनंद द्विगुणित केला. सर्व विद्यार्थ्यांनी शारीरिक व मानसिक दृष्ट्या बलवान असले पाहिजे, व दररोज व्यायाम केला पाहिजे व मनाला नियमित आनंदी व प्रसन्न ठेवलं पाहिजे सकारात्मक विचार करून आत्मविश्वास वाढवला पाहिजे असे मत विद्यालयाचे प्राचार्य सर्वगोड सर सर यांनी व्यक्त केले. अशा प्रकारचे कार्यक्रम अतिशय स्तुत्य प्रिय आहेत विद्यार्थ्यांसाठी खूप हितचे आहेत, अशा प्रकारच्या विविध कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे मत संस्थेचे अध्यक्ष मा. रामचंद्र कदम यांनी व्यक्त केले. संस्था पदाधिकाऱ्यांनी सर्वांचे कौतुक केले. विद्यालयाचे पर्यवेक्षक गलांडे सर व कनिष्ठ महाविद्यालयातील जुनिअर विभाग प्रमुख शिक्षिका सावंत सर, जेष्ठ शिक्षक अर्जुन सर यांनी उपस्थित मान्यवरांना शाल श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.




## बुडतीला काडीचा आधार !

शिरूर कासार ।प्रतिनिधी

गतवर्षीच्या अल्प पावसामुळे तालुक्यात टँकर सुरू झाले होते ,अशातच शहरा जवळ असलेला सिध्देश्वर बंधारा देखील कोरडाठाक पडला होता ,परिणामी हातपंपाला पाणी येणे बंद झाले होते अशा परिस्थितीत मृग नक्षत्राने बुडतीला काडीचा आधार असल्यासारखे झाले ,सिध्देश्वर बंधा-यात पंचवीस टक्के नवे पाणी जमा झाल्याने बंद पडलेल्या हातपंपाना व बोअरला देखील जिवदान मिळाले असुन काही अंशी का होईना गरजेपुरते पाणी येऊ लागले ही देखील तेव्हडीच समाधानाची बाब मानली जाते .

हा बंधारा कोरडाठाक पडला होता ,यातील गाळ उपसा सुरू झाला होता मात्र गाळावरून वाळूकडे अघोरी प्रवास सुरू झाल्याने रितसर काम बंद झाले होते .मोठ मोठे खड्डे बंधा-यात पडले ,या वर्षी पावसाने प्रारंभच आशादायी केला आणि मृग नक्षत्राने सिध्देश्वर बंधा-याला पाणी जमा झाले .त्यामुळे जवळपासचे हात पंप ,बोअर सुरू झाल्याने बुडतीला काडीचा आधार मानला जातो .बंधा-याच्या खाली सिंदफना नदीच्या डोहात सुध्दा साचलेले चित्र दिसून येते .

# तलवाडा जि. प. शाळा व ईदगाह परिसरातील घाणीचे साम्राज्य काढा -खिजर सौदागर

तलवाडा ।प्रतिनिधी

ज्ञानदानाचे काम करणाऱ्या जिल्हा परिषद शाळा व धार्मिक स्थळ असणाऱ्या ईदगाह , जिल्हा परिषद सध्या येड्या बाबळी शेणखत व घाणीच्या साम्राज्य हा परिसर वेड ला असून याप्रकरणी संबंधित मुख्याध्यापक व ग्रामपंचायत यांना सांगून कारवाई करून हे घाणीचे साम्राज्याचा परिसर रिकामा करून घ्यावे नसता संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष शेख खिजर सौदागर व गावकऱ्याकडून होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की तलवाडा जिल्हा परिषद शाळा व धार्मिक स्थळे सध्या अतिक्रमण व घाणीच्या साम्राज्य च्या विळख्यात सापडलेला असून याकडे गावातील सुज्ञ नागरिक शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायतचे दुर्लक्ष होत असल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे आहे .

जिल्हा परिषद शाळेच्या चहुबाजूने येड्या बाभळीचे साम्राज्य आहे या ठिकाणी गावातील नागरिक स्वच्छालय म्हणून आजूबाजूची असणाऱ्या बाभळी व पाण्याच्या टाकीचा आसरा घेत आहेत त्यामुळे या ठिकाणी संडासची दुर्गंधी शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठे प्रमाण होत आहे त्या दुर्गंधीत शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी खिचडीचा स्वाद घ्यावा लागत आहे तर शाळेच्या बाजूच्या परिसरात येड्या बाभळी व गावातील काही नागरिकांनी शेणखत व इतर अतिक्रमण केलेले आहे त्याच बाजूला ईदगाह असून या ठिकाणी मुस्लिम बांधव सणानिमित्त नमाज पाडण्यासाठी येत असताना मात्र या ठिकाणी येण्या जाण्यासाठी असणाऱ्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्यामुळे नागरिकांना आपली वाहने पोलीस प्रशासनाची वाहने व भेटण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास होत आहे एवढे होत असताना मात्र स्थानिक लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत आहेत.

जिल्हा परिषद शाळेच्या चहूबाजूने मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य येड्या बाभळी शाळेच्या भिंती जवळचे संपूर्ण घाण जेसीबीच्या साह्याने साफ करण्यात यावी,जेणे करुन विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो.साप, विंचू असे विषारी प्राणी वास्तव्यास राहू शकतात तरी याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी शाळा व्यवस्थापन व




ग्रामपंचायत ने तात्काळ दखल घेऊन ज्यांनी अतिक्रमण केलं ज्यांनी घान केली आहे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून ते अतिक्रमण सुपडा साफ करावे अशी मागणी होत असताना शाळेच्या भिंतीच्या बाजुला येड्या बाभळीमुळे शाळेत येणाऱ्या जाणाऱ्या वाहनधारकांना मुलांना शिक्षकांना मोठा त्रास होत आहे तर ईदगाह समोरील वाढलेल अतिक्रमण तात्काळ रिकामे करून शाळेतील मुलांना मोकळा श्वास घेण्यासाठी संबंधित प्रशासनाने तात्काळ दाखल घ्यावी अशी मागणी तलवाडा येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष शेख खिजर सौदागर व रमेश नाटकर यांनी केली असून त्यांनी याप्रकरणी संबंधितांनी तात्काळ हे अतिक्रमण न काडल्यास ग्रामपंचायत व संबंधित अतिक्रमणधारकांच्या विरोधात जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले.

# बीड जिल्ह्यातील पोलीस पाटलांच्या रिक्त जागा तातडीने भरा-माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पोलीस पाटील पदाच्या रिक्त जागा अनेक वर्षापासून तशाच आहेत राज्य शासनाकडून या जागा भरण्याबाबत अनेक वेळा सूचना आल्या होत्या मात्र तरीही या जागा भरल्या गेल्या नाहीत पोलीस पाटील संघटनेच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती केली त्यानुसार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे या जागा तातडीने भराव्यात अशा प्रकारचे निवेदन दिले आहे

बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पोलीस पाटलांच्या जागा रिक्त या साठीची बिंदू नामावली अंतिम होऊन आरक्षण ही जाहिर झालेले आहे. परंतु पुढील भरतीची प्रक्रिया सुरु झालेली नाही. अनेक गावातील पदे रिक्त असल्यामुळे पोलीस प्रशासनाला कायदा व सुव्यवस्थेसाठी अडचण निर्माण होत असून अनेक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. तरी या बाबत तातडिने कार्यवाही करण्यात यावी. बीड जिल्ह्यात सातशे गावांमध्ये पोलीस पाटील पदे आहेत, तिला अनेक गावांमध्ये पोलीस पाटील नसल्यामुळे स्थानिक पोलिसांना देखील या ठिकाणी अडचण निर्माण होऊ लागले आहे अनेक गावच्या कारभारात पोलीस पाटलाची महत्त्वाची भूमिका असते त्यामुळे या जागा भरणे खूप महत्त्वाचे



आहे पोलीस पाटील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी माजी मंत्री क्षीरसागर यांच्याकडे याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती केली आहे त्यानुसार जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन या जागा तातडीने भराव्यात अशी मागणी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केली आहे

# शासकीय गायरान जमिनीवरील अनुसूचित,जाती जमातीचे भूमिहीन नागरिकांनी सन २०१० पर्यंत केलेले अतिक्रमणे नियमित करावेत- यशवंत खंडागळे

आष्टी ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील शासकीय गायरान जमिनीवर अनुसूचित जाती जमाती व भूमिहीन शेतमजूर नागरिकांनी सन २०१० पर्यंत अतिक्रमणे करून शेतजमिनी म्हणून वहीती करीत आहेत. पक्के घरे,गोठे बांधून रहिवास करीत आहेत. त्यांना इतर कुठलाही प्रकारचा आधार नाही.कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. यापूर्वी ग्रामीण महाराष्ट्रातून असे कुटुंबातील अनेक व्यक्ती स्थलांतरित होऊन पोटापाण्यासाठी शहराकडे गेलेली आहेत. विस्थापित झालेली आहेत.यापूर्वी सन १९९० पर्यंतची अतिक्रमणे शासनाचे उदासीनतेमुळे नियमित करण्यामध्ये दिरंगाई झाली आहे. हे विशेषत्वाने नमूद करीत आहोत.अनुसूचित जाती जमातीचे लोकांना कायदा व नियमांचे ज्ञान नसल्याने अनेक लोकांनी शासनाकडे प्रस्ताव दिलेले नाहीत परंतु त्यांच्या शासकीय गायरान जमिनीवर सन १९९० व त्यानंतर



आजपर्यंत आहेत. महाराष्ट्रातील लाखो कुटुंबे असे असून अतिक्रमीत जमिनीवर उपजीविका भागवीत आहेत.मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडील डणजचजढज झखङ छे-२/ २०२२ मधील आदेशाप्रमाणे दि.८ मे २०२४ चे आदेशाप्रमाणे दि.१४ आगस्ट २०२४ पर्यंत निवेदनात नमूद केलेली अतिक्रमणे हटविण्यास उच्च न्यायालयाकडे तात्पुरती स्थगिती पण दिलेली आहे.या कारणास्तव लोककल्याणकारी निर्णय घेऊन सन २०१० पर्यंत महाराष्ट्रातील अनुसूचित जाती व भूमिहीन शेतमजूर या वर्गातील नागरिकांचे अतिक्रमणे नियमित करण्याबाबत राज्यशासनाने निर्णय घ्यावा अशी मागणी डा.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे बीड जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे.यावेळी डा. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे मार्गदर्शक .

# महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे पक्षप्रमुख संजय भैय्या सोनवणे यांना विधान परिषदेवर घ्या :- एम आर पी ची

**अजित दादांना मागणी**

**गेवराई ।प्रतिनिधी**

**महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे पक्षप्रमुख संजय भैया सोनवणे हे सर्व धर्मांना सोबत घेऊन चालणारे युवा नेतृत्व आहेत महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या वेळेस दलितावर अन्याय अत्याचार झाला त्यावेळेस सर्वप्रथम संजय भैय्या सोनवणे हे दलितांच्या मदतीला धावून जातात महाराष्ट्रातील शेतकरी बांधव असेल मजूर बांधकाम ड्रायव्हर बांधवांचे प्रश्न असतील किंवा विद्यार्थ्यांचे प्रश्न असतील सर्वसामान्य न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न ते करतात सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन जाणारे**



**युवा नेतृत्व**

म्हणून आज संजय भैय्या संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून आत्तापर्यंत सुशिक्षित बेरोजगार युवकांना संजय भैय्या यांनी शासकीय योजनेतून ७२ बोलोरो पिकप वाटप केले व बहुजन समाजातील युवकाना रोजगार उपलब्ध करून उद्योगाकडे वळवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड लक्ष्मण उमाप खाजाभाई शेख भिवा हातागळे आप्पासाहेब मस्के गणेश दिवाण युसुफ शेख हे सर्व पदाधिकारी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजित दादा पवार साहेब यांची भेट घेवुन संजय भैय्या सोनवणे यांना विधान परिषदेवर घ्या अशी मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजित दादा पवार साहेब यांना भेट घेऊन करणार आहेत अशी माहिती जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे



राज्य शासनाने वक्फ मंडळाला १० कोटी व औरंगाबाद वक्फ मंडळाला २ कोटी निधीही वितरीत केल्या बद्दल बीड जिल्हा स्व. अमोल भैय्या गलधर युवा मंचच्या वतीने राज्याचे उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे आभार व्यक्त केले. तसेच वक्फ बोर्डाचा ढिसाळ कारभारामुळे अनेक जागी अतिक्रमण झाले आहे यास कारणीभूत संबंधित अधिकारी व सदरील कमिटी आहे असा आरोप करत नवीन समिती गठीत करावी व भ्रष्ट अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. तासेच वक्फ बोर्ड मध्ये ज्या प्रलंबित तक्रारी आहेत त्या तत्काळ निकाली काढण्यात याव्यात. अशी मागणी मोहम्मद अझरुद्दीन उर्फ ए. एस. गोलू यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे केली आहे.

# डॉ गेवराई येथे न्यू हायस्कूल मध्ये जागतिक योग दिन साजरा

**पतंजली योग समितीचे सह जिल्हा प्रभारी जिजा नाटकर यांनी दिले योग प्रशिक्षणाचे धडे**



गेवराई ।प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त गेवराई शहरातील न्यू हायस्कूल येथे शुक्रवार दि.२१ जुन रोजी योग दिन साजरा करण्यात आला यावेळी पतंजली योग समितीचे सह जिल्हा प्रभारी जिजा नाटकर यांनी विद्योयार्थ्यांना ग प्रशिक्षणाचे धडे दिले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त न्यू हायस्कूल येथे पतंजली योग समितीचे सह जिल्हा प्रभारी तथा योग प्रशिक्षक जिजा नाटकर यांनी विद्यार्थ्यांकडून योगासन व प्राणायाम करुन घेतले व योगाचे महत्त्व विशद केले यावेळी शाळेचे मुख्यध्यापक तौर, पर्यवेक्षक डांगरे, वायाळ, चाळक, बोराडे, अमर नाटकर, ढवळशंख, ढाकणे, जामकर यांच्या सह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळच्या प्रसन्न वातावरणात योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# एटीएम मशीन व मशीन मधील २२ लाख चोरट्यांनी पळवले




किल्लेधारुर -दि.२२ जून - धारूर तेलगाव रोडवरील भारतीय स्टेट बँकेचे एटीएम मशीन -ढच् चोरट्यांनी पळवल्याची घटना मध्यरात्री घडली.पिकअप गाडीच्या साह्याने मध्यरात्रीच्या सुमारास भारतीय स्टेट बँक शाखा तेलगाव रोड येथील २१ ते २२ लाख रोकड असलेली एटीएम मशीन अज्ञात चोरट्यांनी पळवली. सदर बाब पोलिस व बँक कर्मचाऱ्यांच्या लक्षात येताते पहाटे सदर पिकअपचा पाठलाग केला. माजलगाव तालुक्यातील जायकोवाडी येथे चोरी करणारे पिकअप वाहन सापडले असून मशीन मात्र पोलिसांच्या हाती लागलेली नाही. याबाबत धारुर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक डि.बी. वाघमोडे यांच्याशी संपर्क केला असता सदर पिकअप ९ संभाजीनगर येथून चोरी केलेला असून गुन्ह्याचा तपास जलद गतीने करुन एटीएम व आरोपींना ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती दिली.

# नगरपरिषदेने आझाद नगरचा अर्धवट सोडलेला सिमेंट रस्ता पूर्ण करावा

आझाद नगर संघर्ष समितीचा मुख्याधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे इशारा.

माजलगाव ।प्रतिनिधी

नगरपरिषदेने आझाद नगर येथील धारुर रोड ते बायपास रोड हा सिमेंटरस्ता तात्काळ सुरु करावा. त्याचप्रमाणे नगर परिषदेत चाललेल्या अनागोंदी कारभाराची चौकशी करण्यात यावी.अन्यथा मंगळवार दि.२५ रोजी पंढरपुर हायवे,छत्रपती शिवाजी विद्यालय कॉर्नर येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल.असा इशारा मा. नगरसेवक सय्यद सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली आझाद नगर संघर्ष समितीच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे देण्यात आला.

याद्वारे दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की,स्वतःमुख्याधिकारी व कार्यालयातील त्यांचे इंजिनियर एका माजी नगरसेवकाचे ऐकून आझादनगर येथील गोरगरीब लोकांमध्ये राजकारण करीत आहेत.त्यामुळे येथील नागरिकांचे वेगवेगळ्या समस्यांनी हाल होत आहेत.त्यातच आझादनगरचा धारुर रोड ते बायपास रोड हा अर्धवट झालेला आहे.अशा अर्धवट रस्त्यामुळे लहान,थोर,महिलांची परेशानी होत आहे.त्यामुळे हा रस्ता तात्काळ पूर्ण करावा.शहरामधील झालेले सिमेंट रस्ते,नाली बांधकाम,पाईपलाईन हे कामे अत्यंत बोगस स्वरुपाची झालेली आहे.याची चौकशी कॉलेटीकंट्रोल द्वारे करण्यात यावी. शहरामधील सर्व डि.पी.रोड चालू करण्यात यावे.तसेच सर्व

ओपनस्पेसवरील अतिक्रमणे तात्काळ काढण्यात यावे,न.प.फंड यामध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे.याची सुध्दा चौकशी करण्यात यावी.न.प.चे अधिकारी सत्ताधाऱ्यांना हाताशी धरुन आझादनगर येथील जनतेस नाहक त्रास देत आहेत अशा न.प.च्या कर्मचाऱ्यांची तात्काळ चौकशी करण्यात यावी.अशा विविध मागन्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या



आहेत.दरम्यान सदरील मागण्याची गांभिर्यपूर्वक दखल घेऊन त्या पूर्ण न केल्यास मंगळवार दि.२५ रोजी पंढरपुर हायवे,छत्रपती शिवाजी विद्यालय कॉर्नर येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल.असा इशारा सय्यद सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली आझाद नगर संघर्ष समितीच्या वतीने मुख्याधिकारी यांना देण्यात आला आहे.या निवेदनावर शेख आसेफ हारुन,फारुकआण्णा, महेबुब चुन्नु,रईस कादरी,शेख सादेक ईब्राहीम,शमशेरखाँ पठाण, सत्तारभाई टेलर,सय्यद रहीमफिटर, बाबासाहेब साळवे,सोनबा धीरे, शेख जमील,अन्सरखाँ पठाण, महेमुद मिर्झा बेग,शेख इलियास मासुम इत्यादींच्या स्वाक्षरी आहेत.




## आदर्श देवगाव या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार लोकअर्पण सोहळा संपन्न

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव या ठिकाणी, गेल्या अनेक वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार करण्याचा ग्रामस्थांचा निर्णय, अखेर आज सिद्ध झाला, ग्रामस्थांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वाराचे उद्घाटन , करण्यात आले,

यावेळी उपस्थित गावचे विद्यमान सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, गावातील ज्येष्ठ नागरिक युवक तरुण खूप मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, या मध्ये सर्व जातीधर्माचे लोक सहभागी होते आणि सर्वांनी आंनद साजरा केला.

# साठवून ठेवलेल्या घाण मळीचे पाणी शेतात शिरल्याने शेतकऱ्याचा कापूस जळून नुकसान

## अर्जदार शेतकऱ्याची नुकसान भरपाईची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

शिंपेटाकळी शिवारातील गट नंबर १४२ मधील दक्षिण बाजूस पवारवाडी शिव आहे या शिवाच्या पलीकडील बाजूस बालासाहेब बाजीराव जाधव यांची शेतजमीन आहे त्यांनी त्यांच्या शेतामध्ये एन.एस.एल. शुगर्स युनिट-श्रश्रश्र जय महेश साखर कारखाना पवारवाडी ता. माजलगाव येथील मळी सारखा द्रवरूप घाण विषारी पाणी साठवून ठेवलेले होते. व त्या पाण्याची साठवण करून ठेवली होती.या ठिकाणी अर्जदार दत्ता दगडूबा कीर्ते यांचे शेत गट



नंबर १४२ शिवार शिंपेटाकळी व त्यांचे भावाच्या हिश्यात असलेल्या शेतात कापसाची लागवड केली होती परंतु वरील नमूद इसमाच्या शेतामध्ये साठवून ठेवलेले एन. एस. एल. शुगर युनिट श्रश्रश्र जय महेश कारखाना पवारवाडी यांच्या कडील मळीसारखा द्रवरूप घाण पाणी पावसामुळे वाहून अर्जदार दत्ता दगडोबा कीर्ते यांच्या शेतात येऊन त्यांच्या भावाच्या हिश्यात लागवड केलेल्या कापसाचे पीक जळून करपून गेले आहे. तेव्हा वरील नमूद इसमांकडून नुकसान भरपाई द्यावी व त्याने वरील प्रकारचे कृत्य करू नये म्हणून त्याच्या विरुद्ध कारवाई करण्यात यावी व त्याचा योग्य बंदोबस्त करावा अशा मागणीचा अर्ज अर्जदार दत्ता दगडोबा किर्ते रा. शिंपेटाकळी यांनी माजलगाव तहसीलदार यांच्याकडे .

# मोफत रोग निदान शिबिराचा लाभ घ्यावा ऍड. अंबादास जाधव पेंडगावकर

पिंपळनेर ।प्रतिनिधी

समता बहुउद्देशीय ग्रामीण विकास संघ पेंडगाव तालुका बीड यांच्या वतीने कै.सौ. नानीबाई सोपान जाधव यांच्या स्मृती प्रित्यर्थ अंगारकी चतुर्थी निमित्त पिंपळनेर(गणपतीचे)ता.बीड येथे मंगळवार दिनांक २५ जून २०२४ रोजी सकाळी दहा ते एक या वेळेत सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या मोफत रोग निदान शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन ऍड.अंबादास जाधव पेंडगावकर यांनी केले आहे.



आत्तापर्यंत या संस्थेच्या माध्यमातून जिजाऊ जयंती,रामनवमी,अखंड हरिनाम सप्ताह आदींच्या निमित्ताने विविध ठिकाणी रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पिंपळनेर तसेच परिसरातील गोरगरीब जनतेची सेवा करता यावी यासाठीच या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी डॉक्टर सौ.रोहिणी योगेश पडोळ-जाधव,डॉ.सौ.मोहिनी मनोज लांडगे- जाधव,डॉ.योगेश अंबादास जाधव,डॉ.सोनाली रामदास जाधव यांच्यासह तज्ञ डॉक्टरांची टीम उपस्थित राहून विविध तपासण्याच्या माध्यमातून रोग निदान व उपचार करणार आहेत. तरी परिसरातील सर्व गरजवंत रुग्णांनी या मोफत रोग निदान शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन ऍड. अंबादास जाधव पेंडगावकर यांनी केले आहेत


# आंतरराष्ट्रीय योग दिन ; पंकजाताई मुंडे यांचं युट्यूब लाईव्ह ; ३५ हजारांहून अधिक व्हुअर्सनी नोंदवला सहभाग

## विविध प्रकारच्या योगांचे दिले धडे ; सामाजिक प्रबोधनही केलं

मुंबई ।प्रतिनिधी

राजकारण, समाजकारणासह सोशल मिडियावरही सतत सक्रिय असलेल्या भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त युट्यूब लाईव्ह वरून कार्यकर्त्यांना विविध प्रकारच्या योगांचे धडे दिले. राज्यभरातील सुमारे ३५ हजारांहून अधिक व्हुअर्सनी या युट्यूब लाईव्ह मध्ये सहभाग घेतला होता.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज कुठल्याही जाहीर कार्यक्रमात सहभाग न घेता पंकजाताई मुंडे यांनी एका आगळ्या वेगळ्या पध्दतीने योग दिन साजरा करण्याचे ठरवले. खांद्याच्या दुखापतीमुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले. आपल्या जीवनात योगाचे अनन्यसाधारण असे महत्व आहे. देशाचा हा प्राचीन ठेवा आज संपूर्ण जगाने स्विकारलाय. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः यात सहभागी होत असल्यामुळे संपूर्ण जगात याचा अधिक वेगाने प्रसार झाला. योगामुळे शरीरा बरोबरच आतील अवयवांचा देखील व्यायाम होतो तसेच आत्म्याचे देखील शुध्दीकरण होते असं पंकजाताई म्हणाल्या. यावेळी त्यांनी कपालभाती, भस्त्रिका, भ्रामरी, अनुलोम विलोम, ओमकार असे विविध प्रकारचे योगा प्रात्यक्षिक करून दाखवले. पंकजाताईंच्या आजच्या या उपक्रमांचा राज्यभरातील हजारो लोकांनी उत्स्फूर्त लाभ घेत त्यांचं कमेंट्स करून खास अभिनंदन केलं.



### मन:शांतीसाठी योग महत्वाचा

योगा बरोबरच पंकजाताई मुंडे यांनी यावेळी प्रबोधनात्मक विचार व्यक्त केले. आयुष्यात प्रत्येक जण वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असतो. राजकारण, समाजकारण, व्यवसाय करत असताना आपल्याला जीवनात अनेक चढ उतार, सुख दुःखाचे प्रसंग येत असतात. आज कलियुग आहे. कितीही संघर्ष आला तरी चांगले आचार विचार व संस्कारांना सोबत घेऊनच आपल्याला पुढे चालायचे आहे. ध्यान, प्राणायाम,योगासने नियमित केल्याने आरोग्या सोबतच मनस्वास्थ्य लाभते असं त्या यावेळी म्हणाल्या.

# महाराष्ट्र गाजवणाऱ्या नाट्य कलाकारांचा अनिलदादा जगताप यांच्याकडून नागरी सत्कार!

## बीडच्या भूमिपुत्रांनी कलाक्षेत्रात पुन्हा एकदा जिल्ह्याची मान उंचावली- अनिलदादा जगताप

बीड ।प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शंभराव्या नाट्य संमेलना निमित्य जागर नाट्य कलेचा या उपक्रमा अंतर्गत अण्णा भाऊ साठे नाट्यगृह भायखळा मुंबई येथे पार पडलेल्या एकांकिका स्पर्धेत प्रगती सेवाभावी संस्था पाडळी जिल्हा बीडची संतोष पैठणे लिखित आणि दिग्दर्शीत नवस एकांकिका महाराष्ट्रातील साडे चारशे एकांकेतून सहा पारितोषिकासह सर्वोत्कृष्ट ठरली. या एकांकिकेस जागर करंडक, दोन लाख रुपये रोख व प्रमाणपत्र असे पारितोषिक देण्यात आले आहे. या निमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी नवस एकांकिकेचे लेखक दिग्दर्शक संतोष पैठणे आणि एकांकिकेतील सर्वच कलाकारांचा प्रतिष्ठित मान्यवर, पत्रकार तथा नागरिकांच्या उपस्थितीमध्ये भव्य नागरी सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यादरम्यान अनिलदादा जगताप यांनी नवस एकांकिकेतील सर्व कलाकारांचे कौतुक करत बीडच्या भूमिपुत्रांनी कलाक्षेत्रात जिल्ह्याची मान उंचावली असल्याचे मत व्यक्त केले. याबरोबरच अत्यंत कौतुकाची बाब म्हणजे नवस या एकांकिकेला मिळालेल्या यशाच्या श्रेयाचे मानकरी केवळ आणि केवळ संतोष पैठणे आणि एकांकिकेतील सर्व कलाकारच आहेत असे देखील सांगितले.

बीड केंद्रावरून प्रथम आलेली नवस ही एकांकिका उपांत्य फेरीतून अंतिम फेरीत गेली होती, तब्बल साडेचारशे एकांकिकेतून उपांत्य फेरीला २७ एकांकिका आणि त्यातून अंतिम फेरीला नऊ एकांकिका सादर झाल्या. अभिनेते सुबोध भावे, अभिनेत्री मुक्ता बर्वे, विश्वास सोहनी, सतीश राजवाडे, डॉ अनिल बांदवडेकर असे दिग्गज प्रेक्षकांच्या माध्यमातून परीक्षण झाले. नवस एकांकिकेला लेखन उत्तेजनार्थ - संतोष पैठणे,दिग्दर्शन प्रथम - संतोष पैठणी, पुरुष अभिनय प्रथम - विठ्ठल जोगदंड , स्त्री



अभिनय तृतीय- अंकुर तांगडे स्त्री अभिनय उत्तेजनार्थ- मानसी जाधव व सर्वोत्कृष्ट संघ असे एकूण सहा पारितोषिके मिळाली. बीड नाट्य परिषदेच्या माध्यमातून १०० व्या नाट्य संमेलनानिमित्त नाट्य जागर स्पर्धा झाल्या, त्यातून बीड विभागातून प्रथम आलेली एकांकिका शेवटपर्यंत प्रथमच राहील, मुंबईच्या अंतिम स्पर्धेसाठी ९ एकांकिकेतून महाराष्ट्रातून प्रथम येण्याचा मान बीड जिल्ह्याला मिळाला. या एकांकिकेत संतोष पैठणे, अंकुर तांगडे, विठ्ठल जोगदंड, मानसी जाधव, ऋषिकेश रत्नपारखी, अमोल गायकवाड, शितल चव्हाण, स्नेहा वरकटे, रोहित पुराणीक, शुभम चव्हाण, शाहरुख मिर्झा, सचिन पंडित, भूषण ढोबळे, गणेश भोसले, सोनाली मजमुले, आर्या दोडके यांनी भूमिका केल्या तर प्रकाश योजना -अक्षय फुलझळके, अशोक घोलप, संगीत -अशोक थोरात, पवन शिंदे. नेपथ्य - संतोष पैठणे, लक्ष्मीकांत दोडके, रंगभूषा- खंदारे. वेशभूषा- लक्ष्मीकांत दोडके. रंगमंच व्यवस्था- वेद निकम, शुभम खरे, अशोक काळेगावकर, संकेत बोंद्रे, निलेश माळी यांचा समावेश होता.

कलाकारांचा बालेकिल्ला बीडच्या भूमिपुत्रांनी पुन्हा एकदा सिद्ध केले- अनिलदादा जगताप

कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीड जिल्हा सर्वश्रुत आहे किंबहुना हे वारंवार सिद्ध देखील होत आलं आहे. शंभराव्या नाट्य संमेलना निमित्य जागर नाट्य कलेचा या उपक्रमा अंतर्गत अण्णा भाऊ साठे नाट्यगृह भायखळा मुंबई येथे झालेल्या एकांकिका स्पर्धेत संतोष पैठणे लिखित आणि दिग्दर्शीत नवस एकांकिका महाराष्ट्रातील साडे चारशे एकांकेतून सहा पारितोषिकासह सर्वोत्कृष्ट ठरली. बीडच्या भूमिपुत्रांनी नाट्य क्षेत्रात दमदार अशी कामगिरी करत बीडची मान उंचावली आहे. कौतुकाची बाब म्हणजे नवस या एकांकिकेला मिळालेल्या यशाच्या श्रेयाचे मानकरी केवळ आणि केवळ संतोष पैठणे आणि एकांकिकेतील सर्व कलाकार आहेत. नवस एकांकिकेतील सर्व कलाकारांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

# स्व.गोपिनाथ रावजी मुंडे साहेब ऊसतोडणी मजुर व मुकादम वाहतुकदार संघटना यांची बीड जिल्ह्याच्या वतीने भोगलवाडी फाटा येथे बैठक संपन्न

## कर्नाटकातील कारखान्यांनी ३४% टक्के वाढ दयावी महाराष्ट्रातील मुकादम संघटनेची मागणी

धारूर(भोगलवाडी ) ।प्रतिनिधी

गतवर्षी झालेल्या कराराप्रमाणे ऊस तोड मुकादमांना महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी ३४% वाढ लागु केली. मात्र कर्नाटकातील एकाही साखर कारखान्याने ही वाढ केली नसल्याने ऊसतोड मुकादम यांनी आंदोलनाचे हत्यार उपासले असुन, यासाठी महाराष्ट्रातील मुकादमाची एक व्यापक बैठक भोगलवाडी फाट्यावर सिध्दी मंगल कार्यालयात गुरूवारी दुपारी आयोजित केली होती, या बैठकीस सर्व मुकादमांनी उपस्थिती लावली.या बैठकित लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब ऊसतोड मजुर, मुकादम व वाहतुकदार संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष संजय भाऊ तिडके, तुकाराम बापू तिडके,हनुमंत बप्पा नागरगोजे, मा.सरपंच श्रीराम बडे, कृष्णा तिडके यांनी मार्गदर्शन केले.

ऊसतोड मजूर, मुकादमांच्या आंदोलनासंदर्भात शासनाने गतवर्षी झालेल्या बैठकीत ऊसतोड मजूर व मुकादमांना ३४% टक्के दरवाढ केली. सदर दरवाढीची महाराष्ट्रातील सर्व साखर कारखान्यांनी दखल घेत याची अंमलबजावणी करून ऊसतोड मजुर व मुकादमांना ३४ % टक्के दरवाढ लागु केली. मात्र बहुसंख्येने कर्नाटकात जाणाऱ्या या मजुर, मुकदमांना कर्नाटकातील एकाही साखर कारखान्याने या निर्णयाची अंमलबजावणी केली नसुन, दरवाढ ही केली नाही. त्यामुळे ऊसतोड मुकादमांतुन नाराजी व्यक्त केली जात असुन, त्यांनी कर्नाटकात ३४% टक्के दरवाढ लागु करण्याची मागणी केली. महाराष्ट्रातील मुकादम संघटनेतील मेन मुकादमानी ३४% टक्के वाढी प्रमाणे ऊस कामगारांना हिशोब दिला आहे यामुळे महाराष्ट्रातील कुठल्याही मुकादमचा घातपात होवो नये याची काळजी कर्नाटकातील कारखानदारांनी घ्यावी. याच मागणीसाठी महाराष्ट्रातील सर्व ऊसतोड मुकादम यांची एक बैठक भोगलवाडी फाट्यावर सिध्दी मंगल कार्यालयात गुरुवार दि.२० जुन २०२४ रोजी दुपारी एक वाजता येथे आयोजित केली होती .या बैठकीस सर्व ऊसतोड मजूर, वाहतुकदार व मुकादमांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब ऊसतोड मजुर, मुकादम व वाहतुकदार संघटनेचे संजयभाऊ तिडके, तुकाराम बापू तिडके, गोरक्षनाथ



**३४% टक्के वाढी प्रमाणे आम्ही ऊसतोड कामगारांना हिशोब दिला.महाराष्ट्रातील कुठल्याही मुकादमचा घातपात होणे याची काळजी कर्नाटकातील कारखानदारांनी घ्यावी**

रसाळ, देवीदास तोंडे, सुग्रिव मुंडे, हनुमंत नागरगोजे, जयदेव तिडके, महादेव दराडे, कृष्णा तिडके, बंडु राठोड, विनायक मुंडे, बळीराम मुंडे, चंद्रकांत मुंडे, सोमेश्वर भूईटे ,विष्णु मोहिते, समशेरभाई शेख, यांच्या सह सर्व शेकडो मेन मुकादाम या बैठकिस उपस्थीत होते.

या बैठकि नंतर पुढिल बैठक येत्या २५ -०६ - २०२४ वार मंगळवार रोजी कर्नाटकातील सर्व कारखान्याचे अधिकारी बोलावून त्यांच्या सोबत सर्व मेन मुकादम बोलावून बैठक घेऊन वरील सर्व मागण्या यात साखर कारखान्यांनी दखल घेत याची अंमलबजावणी करून ऊसतोड मजुर व मुकादमांना ३४ %टक्के दरवाढ लागु मंजुर करण्या संदर्भात बैठक घेण्यात येणार आहे.

करारा पूर्वी महाराष्ट्रातील मुकदमांचे कर्नाटकातील कारखान्याच्या मुख्य अधिकारीने वाढ बिले अदा करावेत ते बिले ऊसतोड कामगारापर्यंत पोहोचले पाहिजेत यासाठी सर्व मुकादम यांनी शपथ घेऊन ठरवले आहे कारखान्याकडून ऊसतोड कामगारांची वाढ घेतल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाहीत यापुढील संघर्ष कर्नाटकातील कारखानदारांना झेपणारा नाही हनुमंत बप्पा नागरगोजे यांचे वक्तव्य.

संघटन ही काळाची गरज संघटना पूर्ण ताकतीने मुकादम यांच्या पाठीशी कुठल्याही परिस्थितीत कर्नाटक राज्यातील कारखानदारांनी वाढीव वाढ ऊसतोड कामगारांना देण्यात यावी कृष्णा तिडक असतोड मजुर जिल्हा अध्यक्ष बीड.

महाराष्ट्र शासनाने ३४ टक्के दरवाढ केली आहे आणि महाराष्ट्रातील सर्व ऊसतोड कामगार कर्नाटक राज्यांमध्ये जाऊन ऊस तोडतात कर्नाटकातील कारखाने २५ लाख अधिक गाळपाचे आहेत ते आज टाळा टाळ करीत आहेत आपण सर्व मुकादम एकमेकांचे भाऊ आहोत तर एका जोडीने आपण संघर्ष करायचा आहे यासाठी कोणीही कारखान्याशी आपल्या मागण्या मंजूर झाल्याशिवाय करार करू नये २५ तारखेला सर्व मेन मुकादमांनी भोगलवाडी फाटा येथे उपस्थित राहावे संजय भाऊ तिडके स्व.गोपिनाथ रावजी मुंडे साहेब ऊसतोडणी मजुर व मुकादम वाहतुकदार संघटना प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य,

परिस्थितीनुसार अडचणी असतील तरी पण मुकादमानी तयार होऊ नये कारण आपल्याला ऊसतोड मजुरांना ३४ %टक्के झालेल्या वाढीसाठी न्याय मिळवून देयचा आहे आपल्या एकीने नक्कीच आपल्या मागण्या पूर्ण होतील तुकाराम बापू तिडके स्व.गोपिनाथ रावजी मुंडे साहेब ऊसतोडणी मजुर व मुकादम वाहतुकदार संघटना

# स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेची २३ जूनला महत्त्वपूर्ण बैठक

माजलगाव । प्रतिनिधी

स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेची अत्यंत महत्त्वपूर्ण अशी बैठक रविवार दि. २३ जून २०२४ रोजी येथील व्यकटेश हॉटेल बजाज मार्केट माजलगाव येथे सकाळी ठीक ११ वाजता होणार आहे या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष विजय दादा साळवे हे मार्गदर्शन करणार आहे तरी सर्व कोअर कमिटी सदस्य व प्रमुख कार्यकर्त्यांनी या बैठकीला उपस्थित राहावे असे आवाहन स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वाभिमानी रिपब्लिकन सेना ही आंबेडकरी विचाराची बंडखोर व लढाऊ संघटना स्थापन करण्याचा उद्देश संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजयदादा साळवे यांनी यापूर्वी सांगितलेला आहे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला व चळवळीला पुढे नेण्यासाठी व दलित बहुजन समाजाच्या अडीअडचणी समस्या व त्यांच्यावर होणारे अन्याय अत्याचार सोडविण्यासाठी रस्त्यावर उतरून लढणारी संघटना असून स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष विजयदादा साळवे ही गेल्या अनेक वर्षापासून म्हणजे अगदी विद्यार्थी दशेपासून दलित पँथरच्या चळवळीमध्ये व आंबेडकरी विचाराच्या लोकांवर समाजावर अन्याय अत्याचार झाल्यानंतर धावून जाणारं नेतृत्व आहे परंतु दलित पँथर या दलितांच्या लढाऊ बंडखोर संघटना बरखास्त होऊन एकच एक असा दलितांचा रिपब्लिकन पक्ष स्थापन झाल्यानंतर आता आंबेडकर चळवळीचे लोक बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीपासून विचारापासून भटकले असल्याचे दिसून आल्याने समाजावरील होत असलेले व वाढलेले अन्याय अत्याचार रोखण्यासाठी व समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात आंबेडकरी तरुणांचे व आंबेडकर प्रेमी युवकांचे लढाऊ संघटन निर्माण करण्यासाठी स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. या बैठकीचा सार म्हणजे स्वाभिमानी रिपब्लिकन सेना स्थापनेचा वर्धापन दिन साजरा करण्यात येणारा असल्याने त्या विषयावर चर्चा करण्यासाठी व नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूक येतील स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या कामगिरीवर व या पक्षाने लोकशाही व संविधान वाचविण्यासाठी महा विकास आघाडीचे व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना पाठिंबा देऊन दलित समाजातील जना-जनात जाऊन त्यांना लोकसभा निवडणूकीत निवडून आणण्यासाठी जीवाचे रान केले आहे अन् बजरंग बप्पा सोनवणे हे निवडून आलेले आहे त्यामध्ये स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचाही महत्वपूर्ण वाटा आहे. तसेच आगामी होणाऱ्या विधानसभा,जिल्हा परिषद,पंचायत समिती, नगरपरिषद, निवडणुकींच्या संदर्भात या महत्त्वपूर्ण



बैठकीत विचारविनिमय व चर्चा होणार असल्याने सर्व स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या कोअर कमिटी सदस्य तथा प्रमुख कार्यकर्त्यांनी या बैठकीला उपस्थित राहावे असे आवाहन स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या माजलगाव शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

# ओबीसी समाजाच्या वतीने रस्ता रोको आंदोलन

गेवराई । प्रतिनीधी

गेवराई : ओबीसी बचाव आरक्षणासाठी गेल्या नऊ दिवसापासुन प्रा लक्षमन हाके व वाघमारे वडीगोद्री या ठिकानी अमरण उपोषणाला बसले आहेत त्यांची तबय्त अंत्यंत खालवली आहे सरकारने लवकरात लवकर उपोषण करत्यची भेट घेऊन त्याची मागनी मान्य करावी यासाठी गेल्या नऊ दिवसापासुन बीड जिल्हायातील ओबीसी समाज मोठया संख्यानी वडीगोदी येथे जाऊन लक्षमन हाके व वाघमारे यांना समर्थन दिले जात आहे बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज सध्या सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराज आहे आंदोलनाला समर्थन देणयासाठी बीड जिल्ह्यात ठिकानी आंदोलन करणयात येत



आहेत दिंनाक वीस रोजी सिरसमार्ग वतलटेवाडी येथील सरपंच सुरेश मर्कड यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी समाजाच्या वतीने सावरगाव येथील फाटयावर भव्यदिव्य सकाळी आकरा वाजता मादळमोही सर्कल मधील ओबीसी समाजाच्या वतीने शांततेत सरपंच सुरेश मर्कड याच्या नेतृत्वाखाली सावरगाव फाटा येथे

रस्ता रोको आंदोलन करणयात आले या वेळी बाजार समितीचे उपसभापती विकास सांनप सुशील कोळेकर यांच्या सह अनेक विविध पक्षाने पदाधिकारी व ग्रामस्थ मोठया संख्यानी उपस्थित होते यावेळी पोलीस कर्मचारी देखील मोठया संख्यानी उपस्थित होते


# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये योग दिन साजरा



किल्लेधारूर/प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २१ जून रोजी जागतिक योग दिनानिमित्त महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. बालाजी नवले यांनी योगाचे विविध प्रकार व महत्त्व हे प्रात्यक्षिकाद्वारे समजावून दिले. नियमित योगासने केल्याने शारीरिक तंदुरुस्ती व आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. स्नायूंचे विविध आजारांवर मात करता येते असे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोगी शरीरासाठी योग साधना कशी उपयुक्त ठरू शकते हे सांगून सर्वांनी योग नियमितपणे करावा असे उपस्थितांना आवाहन केले. आयोजित कार्यक्रमांमध्ये उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, प्रा. सिद्धेश्वर काळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. आर. भोसले, डॉ. डी. बी. जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे यांबरोबरच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, एनसीसी कॅडेट्स, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थ्यांचे उपस्थिती मोठ्या संख्येने होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले.

# गेवराई येथे न्यू हायस्कूल मध्ये जागतिक योग दिन साजरा



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त गेवराई शहरातील न्यू हायस्कूल येथे शुक्रवार दि.२१ जुन रोजी योग दिन साजरा करण्यात आला यावेळी पतंजली योग समितीचे सह जिल्हा प्रभारी जिजा नाटकर यांनी

विद्योयार्थ्यांना ग प्रशिक्षणाचे धडे दिले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त न्यू हायस्कूल येथे पतंजली योग समितीचे सह जिल्हा प्रभारी तथा योग प्रशिक्षक जिजा नाटकर यांनी विद्यार्थ्यांकडून योगासन व प्राणायाम करुन घेतले व योगाचे महत्त्व विशद केले यावेळी शाळेचे मुख्यध्यापक तौर, पर्यवेक्षक डांगरे,

वायाळ, चाळक, बोराडे, अमर नाटकर, ढवळशंख, ढाकणे, जामकर यांच्या सह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# वटसावित्री पोर्णिमेच्या निमित्ताने महिलांनी केले वृक्षारोपण

वटसावित्री पोर्णिमे निमित्त्याने येथील ग्रीन आर्मीच्या वतीने महिलांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी एस.पी.कुलकर्णी, अभियंता नवनाथ गायकवाड, बी.आर. मसने, संगीता तारडे,बबीता जावळे,मीरा राठोड तसेच राहुल घाडगे,अशोक पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. भारताचा राष्ट्रीय वृक्ष वड असून या झाडाची सावली मोठ्या प्रमाणात मिळते. पूर्वी गावातील एकता ठेवण्याची कार्य वड करत असे. गावातील स्थित्यंतराचा तो साक्षीदार असल्याचे मत मेजर कुलकर्णी यांनी व्यक्त केले.



## खामगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर गावंदरा येथे

# प्रा.लक्ष्मण हाके यांच्या उपोषणातील सर्व मागण्या मंजूर कराव्यात अशी मागणी

धारूर ।प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील गावंदरा बस स्थानकात वर गावकऱ्यांच्या वतीने शुक्रवारी सकाळी साडेदहाच्या दरम्यान रस्ता रोको करण्यात आला यावेळी या खामगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर धारूर तेलगाव रस्त्यावर दोन्ही बाजूने लांबची लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या यावेळी ग्रामस्थांच्या वतीने वाहनांचे टायर जाळून सरकारचा निषेध व्यक्त करण्यात आला यावेळी विविध घोषणा देण्यात आल्या त्याचप्रमाणे वडीगोद्री येथे प्रा.लक्ष्मण हाके यांच्या उपोषणातील सर्व मागण्या मंजूर कराव्यात अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली .या ठिकाणी प्रशासनाच्या वतीने कोणी उपस्थित नव्हते कारण त्यांना याची कल्पना दिली नव्हती .


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT